# लॉकर धोरण

रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाचे दिनांक १८ ऑगस्ट २०२१ चे सेफ डिपॉझिट लॉकर्स सुविधेबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना विचारात घेउन सदरचे लॉकर धोरण ठरविणेत आले आहे.

**ओळख-**

सेफ डिपॉझिट लॉकर्स सुविधा ही बॅंकेच्या खातेदारांना दिली जाणारी पूरक सेवा आहे. के.वाय.सी. कागदपत्रांची पूर्तता करुन घेउन लॉकर सुविधा ही देण्यात येते.बॅंक व ग्राहक यांचे संबध भाडयाने देणारा व भाडेकरु असे आहेत.

**गुप्तता-**

सेफ डिपॉझिट लॉकर्स धारकांबाबत बॅंक संपूर्ण गुप्तता पाळेल.याबाबत कोणतीही माहिती उघड करणार नाही.सदरची माहिती सक्षम वैधानिक अधिकारी यांचे आदेशाची पूर्तता करणेसाठी देण्यात येईल तसेच लॉकर धारकाची स्पष्ट मान्यता असलेस दिली जाईल.

बॅंकेचे लॉकर्स हे करार करणेस पात्र असलेली व्यक्तींना स्वतंत्रपणे अथवा संयुक्तपणे उपलब्ध करता येईल. त्याचप्रमाणे संस्थानाही लॉकर्स सुविधा दिली जाईल.

**लॉकरवाटप-**

लॉकर्स मागणीबाबतचा अर्ज तसेच के.वाय.सी.निकषांची संपूर्ण पूर्ततेची खात्री करुन घेउन लॉकर्स वाटप केले जाईल.

प्रथम मागणी केलेल्या ग्राहकात लॉकर वाटपात प्राथमिकता दिली जाईल.

शाखा लॉकर्स मागणी केलेल्या ग्राहकांची आवश्यकतेनुसार प्रतिक्षा यादी तयार करेल.

**सुरक्षा ठेव-**

लॉकर्स वाटप करतेवेळी किमान तीन वर्षाचे भाडे एवढी व लॉकर्स उघडतेचा अपेक्षित खर्च विचारात घेउन लॉकर्स धारकांकडून मुदतठेव घेण्यात येईल.

**करारप्रत-**

लॉकर वाटप करताना ग्राहकांचे मागणीनुसार लॉकर कराराची प्रत पुरविण्यात येईल.

**लॉकरभाडे-**

लॉकर्सचे आकारानुसार बॅंक वेळोवेळी लॉकर्स भाडे व सेवाशुल्क ठरवेल.

**लॉकरभाडेची वसुली-**

लॉकरभाडे हे अगाऊ भरावयाचे आहे व लॉकर भाडे वसुल न झाल्यास लॉकर धारकास लॉकर उघडणेसाठी प्रवेश नाकारण्याचा अधिकार बँकेस राहिल.तसेच पूर्वग्रह विरहित लॉकर फोडणेचा अधिकार बँकेस आहे.

लॉकरभाडे चे वर्ष हे आर्थिक वर्षानुसार राहील.

**लॉकर्स वापरणे-**

शाखा हया लॉकर्स धारकांचे लॉकर्स सुरक्षेबाबत आवश्यक ती सर्व काळजी घेतील.

लॉकर भाडेधारक हा बँकेच्या कामकाजाच्या दिवशी व कामकाजाच्या वेळेतच लॉकर्सचा वापर करु शकेल.

लॉकर वापरणेपूर्वी याबाबत शाखेत ठेवणेत आलेल्या नोंदवहीत लॉकरधारकास सही करावी लागेल.

लॉकर धारकास लॉकरचे कोणतेळी नुकसान न करता आपल्या लॉकरचा ताबा कधीही सोडता येईल.

**ग्राहकांचेबाबत यथोचित तपासणी-**

शाखांना आपले असणारे ग्राहक व नविन ग्राहकांचेबाबत केवायसी यथोचित तपासणी करणे आवश्यक आहे.

**वापर नसलेल्या लॉकर्सबाबत-**

लॉकर धारकाकडून जर का तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लॉकर सुविधेचा वापर न झाल्यास शाखा व्यवस्थापक संबधित लॉकरधारकाबरोबर त्वरीत संपर्क करुन त्यास लॉकर वापर करणेस अथवा लॉकर सोडणे संबधित सूचना देतील.जरी लॉकरधारक लॉकर भाडे नियमित भरत असला तरी त्यास लॉकर वापरणेसंबधित सूचीत केले जाईल.

शाखेकडून लॉकर धारकास लॉकर न वापरणेचा कारणांची लेखी विचारणा केली जाईल व कारण संयुक्तिक असलेस शाखा व्यवस्थापक त्याची लॉकर सुविधा पुढे चालु ठेवणेची संमती देतील.

जर लॉकर धारकाने कोणताही प्रतिसाद न दिल्यास अथवा सुविधेचा वापर न केल्यास शाखा लॉकरधारकास लॉकर उघडणेबाबत योग्य ती नोटीस देऊन लॉकर उघडणेबाबत विचार करेल.

नियमित भाडे भरुनही जर लॉकर ७ वर्षापेक्षा जास्त काळ वापरात आला नसेल व लॉकरधारकाबरोबर संपर्क होत नसेल तर अशा लॉकर मधील वस्तू कायदेशीर वारसदार

अथवा नामनिर्देशित व्यक्तीस देण्याचा किंवा त्या वस्तूची योग्य विल्हेवाट लावण्याचा अधिकार बॅंकेस राहील.

**लॉकर उघडणेबाबत-**

लॉकरधारकाचे विनंतीवरुन अथवा लॉकरभाडे थकित झाल्यास वा अन्य त्या योग्य कारणांस्तव लॉकर उघडणेत येईल.

लॉकर उघडणेचा खर्च हा लॉकरधारकांकडून वसुल करणेत येईल.

लॉकर युनिट पुरवठादाराचे अधिकृत प्रतिनिधीकडून लॉकर उघडणेत येईल.

लॉकरधारकाचे विनंतीनुसार लॉकर उघडणेकरिता लॉकरधारक अथवा त्याचे वारस ज्याप्रमाणे विनंती असेल त्याप्रमाणे हजर रहाणे आवश्यक आहे.

लॉकर हा बॅंकेकडून उघडणेचा असल्यास लॉकरधारकास पूर्वसूचना देणेत येईल.दोन स्वतंत्र साक्षीदार व बॅंक अधिका-याचे समोर लॉकर युनिट पुरवठादाराचे अधिकृत प्रतिनिधींकडून लॉकर उघडणेची कार्यवाही होईल.

वैधानिक अधिकार प्राप्त अधिका-यांकडून देणेत आलेल्या लॉकर वापरासंबधीचे आदेश जारी केले असल्यास त्याचे पालन करणेत येईल.

**नामनिर्देशन नामांकन सुविधा-**

बॅंकिंग सुधारणा कायदा,१९४९-कलम ४५ ZC ते ४५ ZF अनुसार

अ) बॅंकेने सेफ डिपॉझिट लॉकर्स व सेफ कस्टडी यासाठी नामनिर्देशनाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. बॅंकिंग कंपनी (नामनिर्देशन )कायदा १९८५ ,सहकारी बॅंक (नामनिर्देशन ) कायदा १९८५, ग्राहकांच्या/ लॉकरधारकांच्या संमतीने नामनिर्देशन व्यक्तीच्या पासपोर्ट आकाराचा फोटो साक्षांकित करुन बॅंकेच्या रेकॉर्डला घेणेत येईल.

ब) बॅंकिंग कंपनी (नामनिर्देशन )कायदा १९८५ ,सहकारी बॅंक (नामनिर्देशन ) कायदा १९८५ अनुसार विहीत वेगवेगळया फॉर्मसाठी केवळ अंगठयाचे ठसे दोन साक्षीदार समोर घेणे पुरेसे आहे.खातधारकांची सही साक्षांकित करणे गरजेचे नाही.

क) बॅंकेकडे नामनिर्देशन करण्यासाठी त्यात बदल करण्यासाठी अथवा ते रद्द करण्यासाठी अधिकार लॉकरधारकास राहील.

ड) बॅंकेने ग्राहकांकडून प्राप्त पूर्ण व योग्य पध्दतीने भरलेल्या नामनिर्देशन,बदल अथवा ते रद्द करण्याच्या अर्जाची पोच ग्राहकाला देणेत येईल.

**सेफ डिपॉझिट लॉकर्स मधील वस्तूचा ताबा देणेबाबत-**

अ) जर खातेधारकाने त्याच्या मृत्यूनंतर लॉकरमधील वस्तूचा ताबा कोणाकडे दयावा याचे नामनिर्देशन केले असेल तर खातेधारकाचा मृत्यू दाखला, वारसाचे ओळखपत्र याची योग्य पडताळणी केल्यानंतर,विहीत नमुन्यात लॉकरमधील वस्तूची यादी करुन बॅंक वारसाला लॉकरमधील वस्तूचा ताबा देणेत येईल.जर लॉकर संयुक्तपणे दोघांच्या सहयांनी वापरला जात असेल तर मृत खातेधारकाचा वारसदार व दुसरा खातेदार यांना संयुक्तपणे लॉकर व त्याच्या वारसाबाबत बॅंकिंग नियमन कायदा १९४९ मधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

ब) बॅंकेने लॉकरचा ताबा वारसाला किंवा नामनिर्देशित व्यक्तिला देण्यापूर्वी काही बाबींची खात्री करणेत येईल.

१) खातेदाराच्या मृत्यूबाबतचे कागदोपत्री पुरावे वारसदार किंवा नामनिर्देशित व्यक्तिच्या ओळखीचे दाखल यांची अत्यंत काळजीपूर्वक पडताळणी करणेत येईल.

२) लॉकरचा ताबा देण्यास/न्यायालय/फोरमकडून प्रतिबंध करणारी काही सूचना आहे का याची खातरजमा करणेत येईल.

३) सेफ कस्टडी किंवा सेफ डिपॉझिट लॉकर मधील वस्तूंचा ताबा देताना,हयात खातेदार किंवा नामनिर्देशित व्यक्तिस केवळ कायदेशीर वारसदाराचा विश्वस्त म्हणून हा ताबा देण्यात येईल.

क) अज्ञान वारसदारासंदर्भात,लॉकरचा ताबा कायदयाने सक्षम व्यक्तीकडे दिला जात आहे याची बॅंकेकडून खात्री करणेत येईल.तसेच दोन स्वतंत्र साक्षीदार,वारसदार व बॅंकेच्या सेफ कस्टडी सुविधेशी संबंधित नसणा-या बॅंक अधिका-याच्या उपस्थितीत लॉकरमधील वस्तूची सविस्तर यादी करणेत येईल.

ड) तसेच दावेदार/ वारसदारांकडे लॉकरमधील वस्तूचा ताबा दिल्यानंतर त्यांच्याकडून बॅंकेने सेफ कस्टडी लॉकरमधील सर्व वस्तू मिळाल्याबाबत आणि लॉकर पूर्णपणे रिकामा असून तो नियमाप्रमाणे इतर कोणालाही देण्यास काही हरकत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेतले जाईल.

इ) सामान्य परिस्थितीत काही कायदेशीर तंटा नसल्यास, वारस प्रमाणपत्र, Probate किंवा Bond of Indemnity घेणे बॅंकेसाठी बंधनकारक नाही.

ई)जर वैयक्तिक किंवा संयुक्त लॉकरधारकाने काहीच वारसनोंद किंवा नामनिर्देशन केले नसेल तर वारसहक्क कायदयानुसार जेवढे कायदेशीर वारस असतील त्यांच्याकडे लॉकरचा ताबा दिला जाईल.

**लॉकर स्वाधीन करणे-**

लॉकरधारक कराराचे कालावधीत कोणत्याही वेळेत आपला लॉकर हा लेखी अर्ज देउन व लॉकर चावीचा ताबा देउन लॉकर बँकेच्या स्वाधीन करु शकेल.

**लॉकर थोरण संचालक मंडळाचे दिनांक २० जानेवारी २०२२ चे ठराव क्रमांक १६ ने मंजूर करण्यात आले.**